1177

1177

PRABHĀTA pherī. Bhāga 1 lā, 2 rā, 3, 4 thā.

Mumbaī: P.B. Pāṭhaka, Mahātmā Ejansī, [1931?].

4 vols. 16 cm. (Marāṭhī aneka kaviñcī rāṣṭrīya kāvya mālā)

Natlonalistic songs.

NAI 1329-36 & 1528 [Vols. 1-3 only]

PP Mar B 16/1-4; PIB 72/20A-D

NATIONAL ARCHIVES OF

ARCHIVE
ORIGINAL
COPY

प्रभात फेरी संग्रह. भाग १ ला.

वंदन-मोरया ! उठा

प्रथम वंदना, करू गजानना ॥
संकटं हराया, भरतभू तराव्या ॥
पारतंत्र्य छेदना, स्वहित रक्षणा ॥ प्रथम०
देशभक्तिचा झरा, वाहतो मनीं खरा, ॥
एक हृदयी वासना, स्वराज्य स्थापना ॥ प्रथम०
असहकार मंत्र हा, नित्य जपत तो रहा ॥
हिन्दुची पुरातना, शुद्ध भावना ॥ प्रथम०
गांधीजी कथीतसे, मार्ग हो दुजा नसे ॥
यश कुणास येतना, चळवळी विना ॥ प्रथम०
बहिष्कार एक अंग, आचरा स्वदेशि सांगा ॥
हीच हृदय शोभना, राष्ट्र भाक्ना ॥ प्रथम०

NATIONAL ARCHIVES OF INDIA

स्वदेशी जनाचे श्लोक

स्मरा हो स्मरा धन्य ते लोकमान्य ॥ तयाचे तरी शब्द तुह्मांस मान्य ॥ स्वदेशी व्रताचा करा अंगिकार ॥ बहिष्कार हें सत्य स्वातंत्र्य सार ॥ १ ॥ असहकार हा एकची मंत्र आहे ॥ महात्मा मुनी गांधिजी सांगताहे ॥ हे हिन्द संतान हों आज जागा ॥ तया मंत्रुनी आपुलें जागा ॥ २ ॥ बहिस्कार ही पर्वणी येत मोठी ॥ स्वदेशी वस्त्रा वांचवा साठ कोटी ॥ स्वयें वापरा वस्त्र खादी स्वदेशी ॥ द्या पुण्य होळीस वस्त्रें विदेशी ॥ ३ ॥ न वाटे जाळणें योग्य गोष्टी ॥ तरी वस्त्र द्या आज दुष्काळ भेटी ॥ विदेशी त्यजोनी वरा खादी-दिक्षा ॥ ही देशभक्तांस द्या आज भिक्षा ॥ ४ ॥ पहा चालली लक्षुमी भारताची ॥ मनाला न कां वाटते खंत याची ॥ किती राहती लोक हो अर्ध-पोटीं ॥ स्वदेशी वस्त्रा वांचवा साठ कोटी ॥ ५ ॥ जय जय रघुवीर समर्थ ।

भजन

रघुपति राघव राजाराम । पतित पावन सिताराम
जानकि जीवन रामनाम । सुंदर माधव मेघःशाम

NATIONAL ARCHIVES OF INDIA

12 OCT

आपलें कर्तव्य

[चाल—हा नारायण अडला.]

जय जय विद्यावंद्य गणराज, जयजय टिळक गांधिमहाराज ॥ ध्रु० ॥

स्वराज्य मिळण्या दस लक्षांचें तत्व सांगतो आजीं ॥

सर्वस्वाची करि बा, होळी स्वराज्यकुंडामाजीं ॥ १ ॥

ईश्वर व्हाया, निर्जिव फत्तर घाव टाकिचे साही ॥

वृतिच्छेदा भिऊनि बापा, स्वराज्य मिळणें नाहीं ॥ २ ॥

शिवरायानें राज्य स्थापिलें तृणवद्देहा गणिलें ॥

तन-मन-धन हें अर्पुनि राष्ट्रा उच्चपदाला नेलें ॥ ३ ॥

राष्ट्रसेभेनें निश्चित केला कार्यक्रम बहु नामी ॥

पार पाडणें प्राप्त असे बा ठेऊनि निष्ठा रामीं ॥ ४ ॥

असहयोग ही जालिम मात्रा दास्य हरवा देई ॥

गांधी महात्मा, कुशल भिषग्वर, निष्फल कधिं नच होई ॥ ५ ॥

स्वदेशभक्ता महाराष्ट्रिया, टिळकसखा हा गांधी ॥

देह भिन्न परी आत्मा एकचि, ध्यानीं धरी हें आधीं ॥ ६ ॥

शुद्ध स्वदेशी, बहिष्कारातें योजुनि विजय प्राप्ती ॥

होऊं करोनि सत्य—आग्रहा हींच गणेश विनती ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सत्य समाधि विनंति

चाल—चाल(हमारा राम प्यारा)

मराठे भाइहो ऐका विचारें पाउलें टाका ॥
असे ही वेळ बाणीची, तयाची जागृति राखा ॥ धृ०
निघाला सत्य शोधाया, एवांसें शीणता बायां ।
कसोटी आत्मउपमेची, स्वतांच्या अंतरीं देखा ॥ १ ॥
द्विजांना वा महारांना, गुणाचारि आंगच्या माना ।
गुणागुण व्यक्तिचें देखा, न दावा जातिही हेका ॥ २ ॥
शिवाजी क्षत्रियांमाजी, तसा तानाजि संताजी ।
प्रभूंही जाहला राजी, कृतीनें वंद्य त्रयलोकां ॥ ३ ॥
तुकोबा जातिचा कोमी, प्रभुला भुतलीं आणीं ।
अशा त्या भक्तवर्यांचे, पहावा पाय भीती कां ॥ ४ ॥
जरी त्या चर्मकारातें, करावया स्पर्श मन खातें ।
तरी त्या रोहिदासाचा, समाया कोण घे शंका ॥ ५ ॥
समाजीं अंत्यजांलागीं, वसविलें खालच्या जागीं ।
तथापी पूजिती सारे, महात्मा संत तो चोखा ॥ ६ ॥
पुराणीं म्लेंच्छ भाईना, गणीलें पूज्य सन्माना ॥ ७ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

परी साधू कबीराचा, त्रिलोकीं वांचतो डंका ।
स्वराज्य स्तंभ बांधाया, प्रजेचें ऐक्य हा पाया ।
परी हा घात सत्तेचा, रुचेना नोकरां लोकां ॥ ८ ॥
तयारी भेदयज्ञाची, जहाली लोकमान्यांची ।
तयाला तीन धूर्तांनी, असें हा आणिला धोका ॥ ९ ॥
कुणी हिंदू मुसलमानीं, मराठे ब्राह्मणीं कोणी ।
भ्रमाच्या दाउनी भेदा, स्वताचा राखिती तनखा ॥ १० ॥
स्वराज्या आधिं घेऊं या, कसूं मग खासगी न्यायां ।
स्वदेशा मानुनी चांला, जणों ही भगवी नौका ॥ ११ ॥

भजन

राधा कृष्ण जय कुंजविहारी । मुरलीधर गोवर्धन धारी ॥

सत्याग्रह

आलि वरि स्वातंत्र्याचे आतां निर्भय मन बनलें ।
खुशालआणा बंदुक तोफा तुमच्या तलवारी । आतां निर्भय०
जुलमाचे हे खैर कायदे मान्य आम्हा नाहीं ।
मरण पुरवलें परी गुलामी सहन होत नाहीं । आतां निर्भय०

स्वराज्य अमुचा हक्क आम्ही हा प्राप्त करूनि घेऊं ।
कृत निश्चय हा झाला आता जिवां जीव देऊं । आतां निर्भय०
दाउं नका हो भीति आम्हाला तुमच्या तुरुंगाची ।
श्रीकृष्णाचें जन्म—स्थान हें प्रीति आम्हा याची । आतां निर्भय०
शांतीची ही असहकारिता हिनें जगा जिंकुं ।
मारणें आम्हां ठाऊक नाहीं मरणा आलिंगूं । आतां निर्भय०

काँग्रेस कायदे भंग

पद (चाल २ मुखाचा शोध)

कायदे भंग करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
जुलमी कायदे आतां । बंधूनो मोडण्या करितां ॥
उठाहो स्वस्त-कां बसलां । चला व्हा तयार मरण्याला ॥
असे हे कृत्य करितांना । येईल चीड ब्रिटिशाना ॥
त्रास देतील आपणाला तरि व्हा तयार मरण्याला ॥
गोळीबार करतील । शेवटीं सुळी देतील ॥
तरी हो भिऊ नका त्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
भ्यांड हो उठा लवलाही । मनाची लाज धरा कांहीं ॥
असे का आळशी बनला । चला व्हा तयार मरण्याला ॥
विनवी कवि शंकर । बंधुनो बांधा कंबर ॥
गुलामी नष्ट करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥

ARCHIVES OF INDIA NATIONAL

(चाल–थोर तुझे उपकार)

करा कायदे भंग जनहो । करा कायदे भंग ॥ धृ० ॥
रण संग्राम मर्दे जावया । बांधा चंग ॥ १ ॥ जनहो ॥
ब्रिटिशांचे खरें खरेंते । काढूं वोहर व्यंग ॥ २ ॥ जनहो ॥
किती आजवरी आपणा वरती । केलें यांनी ढंग ॥ ३ ॥ जनहो ॥
आपल्या पैशावरी घडोघडी । करीताती नवरंग ॥ ४ ॥ जनहो ॥
तरीं सोडा याच घडीला । ब्रिटीशांचा संग ॥ ५ ॥ जनहो ॥
उठा बंधुनो सरकाराला । करून सोडूं दंग ॥ ६ ॥ जनहो ॥
शंकर कवि म्हणे या कार्यास्तव । बांधा कंबर तंग ॥ ७ ॥ जनहो ॥

भविष्य

स्वतंत्रता मिळणार आतां । स्वतंत्रता मिळणार ॥ धृ० ॥
आपणा सर्वांवरचें आतां । पारतंत्र्य जाणार । १ । आतां
परदास्याची बेडी आतां । खात्रीनें तुटणार । २ । आतां
इंग्रजशाही पहा बंधुनो । खास आतां बुडणार । ३ । आतां
तुरुंगांतील सर्व पुढारी । लौकरच सुटणार । ४ । आतां
महाभाजींच्या चळवळीचा । होईल जयजयकार । ५ । आतां
जिकडे तिकडे ब्रिटीशावर । बहिष्कार पडणार । ६ । आतां
खरा कायेदभंग कृतीनें । सिद्धच हो करणार । ७ । आतां
शंकर कविचे बोल बंधुनो । खरेच हो ठरणार । ८ । आतां

प्रार्थना

हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा !
आम्हि देऊं आमुचे प्राण माय देशासाठीं जाण !
आम्हा नाहीं भय आता, तुरुंगाच्या घेला वार्ता !
बंदुकीची जड गोळी, आम्हांपुढें तीन झाली !
नाहीं अत्याचार ठावा, आम्हा वर हाचि घावा !
करूं असहकारिता, गोड लागो हेंचि चित्ता !
त्यागुं विदेशी कापड, उडो नेत्रींची झांपड !
आम्हि फिरवूं चरखा देवो हाचि आम्हा हुका !
आम्हा नको तीं कौन्सिलें, नोकरशाहीचें वाहुलें !
नको आम्हा कॉलेज कोर्टें, आमुचें मन त्यांस विटे !
दूर व्हावी अस्पृश्यता, आम्हां—मधुनि तत्त्वतां !
नाथ मनी लागे ध्यास, देवा पुरवावी आस !

❀ समाप्त ❀

सदरील कवितांपैकी छापलेल्या पुस्तकांतील संग्राहक मुद्रक व प्रकाशक पी. बी. पाटक, श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुंबई नं. ४ सन १९३०

NATIONAL ARCHIVES OF INDIA

AMAZON RAINFOREST


ACTION

प्रभात फेरी संग्रह. भाग २ रा.

-स्वराज्याचा डंका-

पद—(चाल हमारा राम प्यारा है)

प्रभातीची प्रभा फांके । निशा लपली रवी घाके ॥ धृ० ॥
उठा हो आर्य पुत्रांनो । उठा गे आर्य भगिनींनो ॥ ० ॥
पहा आली शुभ वेळा । नका मिटवूं अतां डोळा ॥ २ ॥
प्रभा फांके स्वराज्याची । दिशा उठली पहा रवीची ॥ ३ ॥
घोष उठला नौबतीचा । स्वराज्याच्या प्राप्तीचा ॥ ४ ॥
जीव झाला अधिर भारी । चला जाऊं पुरुष नारी ॥ ५ ॥
जळत आहे जीव आमुचा । ध्यास घ्यावा स्वराज्याचा ॥ ६ ॥
बेड्या तोडा गुलामीच्या । हड्डी मोडा गुलामांच्या ॥ ७ ॥
सर्व कर ते न देण्याचें । शास्त्र पढा स्वसौख्याचें ॥ ८ ॥
जगीं कोठे न जें दिसतें । असें हें राज्य कीं वसतें ॥ ९ ॥
जळे हो जीव पाहोनी । चढे संताप क्रोधानीं ॥ १० ॥
अनत्याचार हें अस्त्र । पहा करिं या नसे शस्त्र ॥ ११ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जगानें नेत्र लाविले । बघाया युद्ध हें आपुलें ॥ १२ ॥
कधीं पूर्वी-नसें झालें । असें हें युद्ध जग बोले ॥ १३ ॥
विजय दावूं करूनीया । अशा युद्धीं जगाला या ॥ १४ ॥
खचु न देतां हिम्मतीला । मदत मागूं खुदा त्याला ॥ १५ ॥
चला रे बालवीरांनो । चला हो वृद्ध थोरांनो ॥ १६ ॥
चला रे हिंद-पुत्रांनो । लढाया हिंद-कन्यांनो ॥ १७ ॥ ध्रु०

प्रभात--संदेश

पद—(धन्य शिवाजी तो रणगाजी)

प्रभात झाली उठा भगिनिनो निरोप द्यायला ॥
बंधु निघले स्वराज्य घेण्या अरिशीं लढण्याला ॥ ध्रु० ॥
प्रभात-वेळा शुभदा मोठी रम्या ही आली ।
चालुनि आलां संधी मधु । माय खूप झाली ॥ १ ॥
आशीर्वादा जग जिंकाया बंधूना द्यावें ।
सत्याग्रही त्यां बनावयाला तुम्हीं सांगावें ॥ २ ॥
धन्य कस्तुरी वृद्धा ललना सरोजिनी धन्या ।
हंस कमलिनी लीलावति [illegible] कन्या ॥ ३ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

धन्य मनी येन धन्य लक्ष्मीपथि वन्या या साऱ्या ।
राष्ट्रशक्ति या प्रचंड मोठ्या अरिला जिंकूणाऱ्या ॥ ४ ॥
आर्यभूमिचे सुपुत्र तैसे सौभाग्या कन्या ।
शस्त्र न धरितां लढती म्हणुनी साऱ्या त्या धन्या ॥ ५ ॥
लढत मोठी विचित्र आहे इतिहासीं न ऐशी ।
म्हणुनि म्हणति त्यां मिळेल तो हो विजयश्री कैशी ॥ ६ ॥
सशस्त्र अरिशीं अशस्त्र हस्तें लढणें शौर्याचें ।
त्रिकट खरें परि विजय मिळविती शूर तेच धीरांचे ॥ ७ ॥
स्वकार्य करण्या वीर निवाले निरोप घ्या त्यांचा ।
आर्य—भगिनिनो तयार व्हावें लिंबा लोणाच्या ॥ ध्रु० ॥

राष्ट्र-भजन व मिठाचा सत्याग्रह

पद—(धन्य शिवाजी तो रण गाजी)

उठा मर्द हो धरा अतां तुम्हीं राष्ट्रभजन हातीं ।
कधीं वेळ ही पुन्हां न येई सुरस्य मागूती ॥ ध्रु० ॥
अशस्त्र केलें अरिनें तुम्हां खंति न मानावी ।
अहिष्कार तो टाकुनि त्यांना लज्जा आणावी ॥ १ ॥

पूर्वज तुमचे शूर मर्द ते लढले शक्तीनें ।
लढा तुम्ही हो अरिसी आतां मोठ्या युक्तीनें ॥ २ ॥
म्यांचेस्टरला हाणुनि पाडा बहिष्कारयोगें ।
लज्जा आणा सरकाराला अनुपमेय त्यागें ॥ ३ ॥
सत्याग्रह तो लवण—मिठाचा करुनि कितिक गेले ।
कारागृहींते गांधिवरोवर जग पालुनि डोले ॥ ४ ॥
अशस्त्र करांना शास्त्र—पाणि ते मारुनि विजयानें ।
फुगती परि त्या लाज न वाटे त्यांच्या अनयानें ॥ ५ ॥
पटेल, गांधी, नेहरू, नरिमन्, अवास तय्यबजी ।
वीर लढूनी कारागृहीं ते गेले घाहव्वाजी ॥ ६ ॥
मेहेर अली, सम ते किति तरि हजार भरतील ।
आर्यभूमिला स्वतंत्र करण्या लाखो मरतील ॥ ७ ॥
परि न झगडा मिटतो आतां ध्यानीं हें ठेवा ।
स्वातंत्र्याचा, मिटेल जेव्हां निश्चल तो ठेवा ॥ ८ ॥
कधीं वेळ ही पुन्हां न येई सुरसा मागूती ।
उठा मर्द हो धरा अतां पक्के राष्ट्रध्वज हातीं ध्रु० ॥

महात्माजींचें आवडतें पद

वैष्णव जन तो तेने कहिये जे पीड पराई जाणेरे
परदुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणेरे
सकळ लोकमां सहुने वंदे, निंदा न करे केनीरे
वाच काछ मन निश्चळ राखे, धन धन जननी तेनीरे
समदृष्टि ने तृष्णात्यागी, परस्त्री जेने मातरे
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथरे
मोह माया व्यापे नहि जेने, दृढ वैराग्य जेना मनमांरे
रामनामशुं ताळी लागी, सकळ तीरथ तेना तनमांरे
वनलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्यारे
भणे नरसैंयो तेनुं दरशनं करतां, कुळ एकोतेर तार्यारे

पद

स्वस्थ कसा निजसी । भारता । ऊठ किती निजसी ॥
स्वातंत्र्य रवि उगवे हा बघ । करीं स्वागतासी ॥ धृ० ॥
भूमाता ही विव्हल झाली असह्य परदास्यें
हाक तियेची आर्यसुता तुज ऐकूं ये न कशी ॥ १ ॥

अमेरिका इंग्लंड भोगिती अतुल वैभवासी ॥
दुर्दैवि परी हिंद भूमि ही अजुनी परदास्यीं ॥ २ ॥
वृद्ध महात्मा गांधी शौर्ये ठाके युद्धासी ॥
परी पाय ! तूं तरुण भारता उदासीन दिसती ॥ ॥
परसत्ता बहु मदांध झाली करी धैमानासी ॥
कितिक वीर निजपदीं तुडविले उघडीं नयनासीं ॥ ४ ॥
लालभाई, बजाज नेहरू आणिक गांधीसी ॥
कारामारी बळें कोडिलें सकलही वीरांसी ॥ ५ ॥
स्वातंत्र्यास्तव पेशावर तें रची स्वयज्ञासी ॥
देशभक्तिची ज्वाळा ही बघ चमके आकाशीं ॥ ६ ॥
तोफा बंदुका गोळ्या घेती झेलुन त्वदयार्शी ॥
स्वातंत्र्याचा घोष करोनी चढती स्वर्गासी ॥ ७ ॥
सत्याग्रह स्वातंत्र्यचरणीं या कपट न कवणाशीं ॥
दुखवुं न कवणा कष्ट भोगितां अर्पुहि स्वतनूसी ॥
धर्मयुद्ध हें अद्भुत मीरा शौर्य जरि लढसी ॥
स्वराज्य वैभव भोगशील वा ईशपदा चढसी ॥ ९ ॥
ऊठ ! ऊठ ! ! सावध हो आतां त्यजीं आळसासी ॥
रक्त उसळुदे बाहु स्फुरुंदे घांव संगरासी ॥ २० ॥

पद

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेगें ॥ धृ० ॥
मलमल जो है विदेशी । आणे को गज मिलेंगा ॥
खादी नहि त्यजोंगे ॥ लेंगे ॥ १ ॥
बहोत्तर करोड रुपिया । जा रहे है ॥
उसकुं बचा घचाके । लेंगे० ॥ २ ॥
चरखेकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
अंग्रेज को सुन के । लेंगे० ॥ ३ ॥
या हक्क है हमारा । तनजानसेभी प्यारा ॥
मरणें नही डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥
हम सब परेड फौजी । कसान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसकि लेंगे० ॥ ५ ॥
तेहतीस करोड फौजी । रअ सांथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे लेंगे० ॥ ६ ॥
चरखा ही तोफ बनेगे । तकवा बने है बरची ॥
गोलेसे सबके हंम् लेंगे० ॥ ८ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मर्द बनो

मर्द बनो मर्द बनो, सब हिंदुस्तानी मर्द बनो ॥
सरकारी कानुन चुर करो, परदेशी हुकमत दूर करो दूर ॥ १ ॥
हम मालीक हय अपने घरके, ओ दस्तन दाजी कयों करते ॥
सब बंध करो बंद करो, गुलामी खाना बंध करो, मर्द ॥ २ ॥
आयाथा ओ वनीआ होके अब रखता हय बंदुक तोपे ॥
पार करो पार करो, पाजीको दरिआ पार करो, मर्द ॥ ३ ॥
बहेतर है पेहेने हथ कडीयां, जौहरकी आई है घडीयां ॥
डरने वाले मेनो चुडीया, डुब मरो डुब मरो मुलपाक जलमे डुब मरो ४
अब आग लगी हिंदुस्तानमें, है कोन छूपेगा जो घरमें ॥
नाश करो नाश करो, गोरोके देश नीकाल करो, मर्द ॥ ५ ॥
सब सपुत उठो साथ चलो, ए शासन को बरबाद करो ॥
याद करो याद करो, जलीयां के जुल्मो याद करो, मर्द ॥ ६ ॥
ए नादिर शाही नाश करो, खुद जलके उसके खाख करो ॥
कुद पडो कुद पडो, मैदाने जंगमें उछळ पडो, मर्द ॥ ७ ॥
ए जुल्म नहीं हम सहलेंगे, जालीम को यहासे भगा देंगे ॥
दूर करो दूर करो, भारतसे उसकु दूर करो, मर्द ॥ ८ ॥

सब हिंदुस्थानी मर्द बनो

अनेक कवींनी छापलेल्या पुस्तकांतील संग्राहक मुद्रक व प्रकाशक
पी. बी. पाठक, श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुंबई नं. ४ सन १९२०



P/B 72/20 P/B 72 C

देशाचा पालनवाला हें पद शिवाजीचा पोवाडा

(संपादक नामदार जाधव) या पुस्तकातील चवथा आहे.

प्रभात फेरी.

BOMBAY - P. G. Padhye

॥ हे ॥

बॅरिस्टर-गांधी.

P+ 3

प्रि. प.-पी बी. पाटक, पां. वै. प्रेस, मुंबई ४.

-किंमत १ आणा-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रभात फेरी ॥ ३ ॥

॥ हर हर महादेव बोला ॥

प्रभात-भूपाळी (चाल—घनश्याम सुंदरा०)

प्रभात-फेरी वदे हिंदुना अरुणोदय झाला ॥
स्वातंत्र्याचा मंत्र ' हर हर महादेव ' बोला ॥ध्रु०॥
प्रभात आली उठा हिंदुहो । कार्य करायाला ।
स्वातंत्र्याचा विजय-शब्द तो हर हर महादेव बोला
धाय मोकली हिंदभूमि । ही बद्ध असे झाली ॥
लोहशृंखलीं गुलाम गिरीच्या । तिला बांधियेली ॥
हिंद बंधुहो तिच्या सुतांनो । गुलाम तुम्हि झालां ॥
लाज केवढी तुम्हां जगीं ही । षंढ तुम्ही बनलां ॥
मुक्तता आर्यभूची झडकरि आंग्ल-करांतुनि व्हावा
राष्ट्रध्वज हा करीं घेऊनियां जाऊं फडकवाया ॥
उठा मर्द व्हा टाकुनि निद्रा प्रभात हा झाला ॥

स्वराज्य-नौबत झडूं लागली हर हर० ॥ २ ॥
फुकट बोलणे टाकुनि द्यावे । सज्ज तुम्ही व्हावें ॥
इंग्रज करिचें राज्य तूमचें । हिसकुनि तुम्हि घ्यावें ॥
छी थू तुमची जगीं होतसे । गमत न लाजेला ! ॥
काळीं ठिकर मुखें जाहलीं । लढा मुक्त व्हायाला ॥
झुंजा अरिशीं रणमल्ल मांडा । भांडा जोरानें ॥
दुर्हा मोडुनी कुटा अरीला । खंबिर मनसानें ॥
उठा मर्द हो वेळ पातली । स्वराज्य-रवि आला ॥
उदया चलितो दिसूं लागला । अरि घरि भीतीला ॥
लज्जेस आर्यभूच्या रक्षणें लज्जेस पूर्वजांच्या ॥
शूरवीर हो रणीं ठाकुंया । छातीवर अरिच्या ॥
चला मर्द हो एक होउनी । स्वराज्य घ्यायाला ॥
स्वराज्य-नौबत झडूं लागली, हर हर० ॥ २ ॥
क्रिश्चन भाई, पारशि भाई, मुसलमान भाई ॥
हिंदभूमिचे सुत हे सारे । हिंदभू आमुची आई ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सुपुत्र आम्ही भिडुनि सांगा जाउं लढायाला ॥
मुक्त करूं माय आमुची । सोडुनि द्वैताला ॥
राष्ट्र-मुखाचा कलंक धुउनी टाकूं या आतां ॥
अरिरुधिराचा तिलक लावुनी रक्षूं गोमाता ॥
जाउं या संगरा झडकरिहो राष्ट्रीय मंगलाला ॥
टाकूनि रणशौर्यातें आपण मिरवुं विजयमाला ॥
संगर-तांडव घोर करूनी स्वराज्य ध्याया गा ॥
स्वराज्य-नौबद झडूं लागली : हर हर० ॥ २ ॥
मिठास पट्टी इनकपपट्टी डोईला पट्टी ॥
किर्ता॰ पट्ट्या पोशिति नौकरशाही ती लट्टी ॥
हिंदभूमि ही पिल्लानिनेता सर्वांचे संपत्ती ॥
तयामुळें ही सर्व पसरली दारिद्र्यापत्ती ॥
शस्त्र न लाठी आम्हां हाती धरण्या ते देती ॥
अशस्त्र ऐशा आम्हांला ते खुशाल बडवीती ॥
लाज न त्यांना भूतदयेची । रावणी राज्य त्यांचे ॥

नको आम्हां तें मोडुनि पाडूं जुवाड परवशतेचें ॥
सोडुनियां आळस फुंकावें तुम्हि रण शिंगाला ॥
लढावयाला निघा झडकरी । वराया विजयमाला ॥
सौमित्राचे वदणें ऐका चला लढायाला ॥
स्वराज्य-नौबद झडूं लागली । ' हर हर० ॥ ३ ॥

पद--(आनंदाचा कंद)

उठा बंधुनो चला झडकरि । क्षत्रियबाणा प्रगटकरा ॥ धृ० ॥ सत्वरतेनें--एक जुटीनें । संग्रामार्चा वाट धरा ॥ बहु दिवसाची--परदास्याची । बेडी तोडण्या पुढें सरा ॥ देशासाठीं धर्मासाठीं । स्वस्थ न बसतां रणिं मरा ॥ श्री शिवबाची--तानाजीची । कर्तबगारी मनीं स्मरा । आपण त्यांचे वंशजसाचे । विचार हा तुम्हीं करा जरा ॥ महात्माजींचा स्वातंत्र्याचा । लढा बंधुनो आहे बरा ॥ शस्त्र न घेतां--आहे आतां लढण्याचा हा मार्ग बरा ॥ शंकर कविचे बोल हिताचे पक्के ध्यानी मनी धरा ॥

देशाचा पालनवाला.

देशाचा पालनवाला तो शिवाजी राजा झाला।
धर्माचा रक्षणवाला तो शिवाजी राजा झाला.॥
त्रिभुवनांत डमरू ज्याचे । नादतांच नंदी नाचे॥
जो परित्राण या भूचे । शंकर भोला ॥ १ ॥
गर्जते भवानी मेघा । चमकते भवानी खांडा ॥
चाललाच भगवा झेंडा । रण-नाचाला ॥ २ ॥
तुकयाचा प्रेमळ वीणा । गर्हिवरवीं अंतःकरणा॥
कल्पनेच्या घेउनि ताना । उठवी हरिला ॥ ३ ॥
प्रभु रामदास तो आला । राष्ट्राचा जादूवाला ॥
मावळा मंत्रिला सगळा । भालेवाला ॥ ४ ॥
रणयज्ञ-विजय-हेरंबा । पूजाया रणजगदंबा ॥
तोरणा रण--प्रारंभा । नारळ फुटला ॥ ५ ॥
त्या चंद्रराव मोऱ्याला । दास्याच्या सरदाराला॥
भूमीच्या मूर्त न काला । जाळा जाळा ॥ ६ ॥
तो विजापूरचा कोल्हा । वाघास दावि वागूरा॥

वरि वाघनखीं तरवारा । दिसे न त्याला ॥ ७ ॥
सिर्दात शत्रुचे बाण । निज मरणावर तोल ॥
त्राणांत भूप झेलून । बाजी पडला ॥ ८ ॥
पुण्यांत राजवाड्यांत । खड्गाची रात्र कुजबुजत
ऐकूनि मस्त शाहिस्त । पळुनी गेला ॥ ९ ॥
तो पुरंदरचा झगडा । तो मुरारबाजी लढला
हाताच्या करुनी ढाला । रिपु रोधीला ॥ १० ॥
तो औरंग्या दिल्लींत । शिवपवन धरी डावांत
परि पवन हाव उडवीत । उडुनी गेला ॥ ११ ॥
मग सिंहगडाचें युद्ध । गड चढला वैभवसूर्य ॥
रक्ताचें देउनि अर्घ्य । तान्हा गेला ॥ १२ ॥
किर्ती असे वीर वर्णिले । किति जणा पवाडे गाले ॥
कवितेनें ओवाळावें । कुणा कुणाला ॥ १३ ॥
श्रीस्वातंत्र्याची माला । वीरांनी गुंफुनि विमला ॥
अर्पिली देश-देवाला । हर हर बोला ! ॥ १४ ॥
वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगण बनला ॥
शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला ॥ १५ ॥

स्वदेश गीत

प्रिय भगिनींनों विनती करीतसे स्वदेश प्रीती धरीं धरा । सोडुनी द्या तुह्मीं हौस मनींची देशी कंकणे करीं भरा ॥ राष्ट्र गुरु हे महात्माजी सांगती ऐसे सकलाला । धंदा आमुचा सर्व बुडाला कठीण काळ हा आजि आला ॥ दारिद्र्यानें बहुत पीडिले अन्न नसे हो पोटभरी । ऐसे असतां फॅशन तुह्मीं कां सोडाना अजुनी तरी ॥ विलायती हे सुंदर खासे मोह पाडिते बहुत मना । नाना परिनें भुलवुनी तुह्मां पिळुनी नेई सर्व धना ॥ कामधेनु सम मातृ भूमिही अगणित येथें धान्य पिके । विलायते मध्यें कसे चालले हिंदी मरती सर्व भुके । कांच देऊनि सुवर्ण नेती भुलवुनी तुह्मां परोपरी । गाजी ह्मणोनी पाजी करीती सावध व्हाना अजुनि तरी ॥ वीर माता वीर कांता होऊनी गेल्या बहुत परी । अहिल्याबाई जिजा लक्ष्मी सांगु अशा या किती तरी ॥ त्या देशामधिं तुह्मीं जन्मला आठ·

वण ह्याची मनीं धरा । बहिष्कार हे व्रत अच-
रोनी मातृभूमीला पुनीत करा ॥ राघ्र्याही माता
तुम्हीं बोलतां ऐसे सर्व जनीं । उदासीन कां अजुनि
असतां लागा कार्या वेगानीं ॥ प्रपंचीही श्रम
बहु तुम्हां विश्रांतीहि मुळी नसे । त्यांतच लवपळ
वेळ काढोनि सुत काढाहो थोडेसे ॥ थेंबे थेंबे
वर्षुनि घन बहु पोषण करितो सर्वांचें । अगणित
युवती सूत काढितां कार्य होई बहु देशाचें ॥
क्षुद्र बुद्धि हे जाती मत्सर यासी थारा देऊं नका ।
स्वधर्म पाळा बहु प्रीतीनें परधर्मासि निंदु नका ॥
कंठ स्वानें बाळ टिळक हे सांगुनि ऐसें सकळांला ।
स्वराज्यास्तव श्रमुनि भागुनि गेले हो वैकुंठाला ॥
अल्पमती मी विनति करितसे सर्व भगिनिनों
क्षमा करा । त्याज्य असे ते टाकुनि द्या तुम्हीं
ग्राह्य असे ते मनीं धरा ॥ गौरिनंदना विघ्ननाशना
सुबुद्धि देई सकलाला । विनायकाची कन्या मागे
अखंड तव पद देई मला ॥

सिंहगड-पोवाडा

भाग १-२-३-४ सचित्र, किंमत ६ आणे.

सवलतीची किंमत ४ आणे.

तिकीट अगाऊ पाठविणें व्ही. पी. ने मागणी करूं नये.

सुधारणेचा चुटका.

भाग १-२-३-४, किंमत १ आणा.

पांच आण्याची तिकीटे पाठवावी म्हणजे वरील दोन्ही पुस्तके पाठवूं. व्ही. पी. ने मागणी करूं नये.

पी. व्ही. पाठक ॲंणि कंपनी.

श्री पांडुरंग वैभव बुक डेपो,

माधवबाग व सूर्यमहाल मुंबई नं. ४.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

SPECIMEN
NATIONAL

प्रभात फेरी संग्रह

-०:-

भाग ४ था.

चालः—(आनंद कंद)

प्रभु तूंच एक वाली । आम्हासी याच काळीं ॥ धृ० ॥
परतंत्र हींद माता । स्वातंत्र्य देईं आतां ।
जुलमींच राज्य सत्ता । आम्हा नकोच आतां ॥ १ ॥
आम्हां नकोच कांहीं । परकेंच ते विदेही ।
परकीय पाश सोडी । जुलमीय बंध तोडी ॥ २ ॥
अत्याचरांस आज । सुलतान शाही राज्य ।
अत्याचरींच जुलमी । सरकार दुष्ट कर्मी ॥ ३ ॥
पंजाब लाल गेला । लाठीस भक्ष पडला ।
नेलें जन्हाहीरांसी । केलें तुरुंग वासी ॥ ४ ॥
पेशावरांसी सारा । झडवुन गोळी बारा ।
सोळा पुरासी—लाहीं । बेबंद पात् शाही ॥ ५ ॥
जुलमानीं ताडियेलें । किती एक वीर मेले ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

निःशस्त्र हींद वीरां । परकीय मस्त गोरां ॥ ६ ॥
बंदीस्त गांधीजींना । विभुतींच थोर यानां ।
हिसकावुनींच नेलें । होतेंच सर्व गेले ॥ ७ ॥
ऐसे सुपूत्र नेलें । तुरुंगांत डांबियेलें ।
अजुनींच शंढ कसलें । परकीय मस्त झालें ॥ ८ ॥
तोडोनीं शृंखलासीं । करूं मुक्त भारतांसी ।
शपताची घ्या तुम्ही तें । स्वातंत्र्य देऊं मातें ॥ ९ ॥
ना खड्ग ढालभाला । निःशस्त्र वीर वाला ।
सत्याग्रहींच शस्त्र । करूं सत्य हेंच अस्त्र ॥ १० ॥
देशार्थी रक्त देऊं । देशार्थी प्राण देऊं ।
स्मरूनींच पूर्वजानां । भू देवी मुक्त करण्यां ॥ ११ ॥
प्रभु दावि दावि मार्गा । स्वातंत्र्य देश दुर्गा ।
प्रभुरे स्वतंत्र आम्हां । करशील तूंची केव्हां ॥ १२ ॥
नकोरे नकोच अंत किती । पाहसी अनंत ।
अजि धांव धांव देवा । करी मुक्त हींद जींवां ॥ १३ ॥

दे. य. सम

चाल—(अपने दाता कीं,)

राष्ट्रविभूती गांधी महात्मा । विनवी हींदिजना ।
म्याऊची बनला भारत पुत्रां । डोळे कां नच उघडीं ।

मायभुमीं हीं दास्यीं रुतलीं कां नच तिजला काढी ॥
दूर देशींचे परकें सोरें सरकार कुठचें झाले ।
बळजबरीनें संपत्ति घेऊनी मालक तेंचि बनलें ॥
जखडुनीं मग तें टाकीं तुम्हाला न्यायची म्हणती वारे ।
अजुनी तुम्ही ते स्वस्थची कसलें कळतची नच कां सारें ॥
हींदि जनता उपाशीं मरते लुटती परी परके ।
नेती सर्व ते इथून तिकडे गवरची होती वेटे ॥
दात न याची तुम्हांस परी ती धुंदी असली कसली ।
विदेशी माला बहिष्कार हा सगळे घाला अजुनीं तरीं ॥
परावलंबी जीणें सर्व हे होई कैसे सहनची रे ।
स्वावलंबना मार्ग धरा मग सुज्ञ सांगती सर्वचि रे ॥
चरक्या वरतीं सूत कातुनीं स्वातंत्र्यची ते मिळवा ।
भुकें परि तें मरतिल परकें मार्ग खरा बरवा ॥
चला ऊठा मग सज्जनो व्हारे मुक्तची करण्या माता ।
स्वातंत्र्यचि रे तिजला देण्या तयार व्हा आतां ॥

कु. प्रभावती

चाल:—(सबसे राम भजन)

परदास्याची निशा संपली जागे कां व्हाना ? ।
पुर्वप्रांतीं स्वातंत्र्याचा रवी हा उदया आला ॥ धृ० ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

परवशतेची नीजची वसली डोळ्यां तीं तुमच्या ।
स्वातंत्र्याची प्रभा उदेली दाहीं दिशा जागृत झाल्या ॥
परतंत्री हें जिणें तुम्हासी सहन कसें होईं बा रें ।
स्वातंत्र्याची ध्वजा उभारा प्रभात समयीं या रे ॥
मेकड सारें तुम्हांस पाहुनीं लुटतीं या काळीं ।
सरसावितीं हे चोरची परकें निर्भयतेनें भारीं ॥
स्वार्थि साधण्या दंडुकशाही परी ते मग दावितीं ।
अबलांवरीतीं हात टाकिती गुंगी असली कसली ॥
मंगल कालीं अशा प्रभातीं घोरत कसलें पडलां ।
स्वातंत्र्याच्या देवतेस मग मुजरा धा पहिला ॥
परवशतेच्या निद्रेची मग धुंदी सगळीं झाडा ।
बंधुभगिनींनों उठा मिरवुंयां स्वातंत्र्याचा झेंडा ॥

कु. प्रभावती

चाल--(अजि अक्रुर हा)

अजि हींद वीरां ऊठ ! ऊठ ! नीज किती। परवशता पाशांची तोडी बृंक
मग शांत कसे बसला तुम्हीं अजुनी । झोंप ती कितीही नयनी ? ॥
परदास्य निशा ऊठची आतां सरली । बघ आला स्वातंत्र्य रवी ॥
या दास्यीं अशा कुठवर मग रहाणार । जखडील तुम्हाला फार ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व्यापारा म्हणुनी आला ।
लावुनी व्यांप हा असलां ।
शिरजोर असा हो बनलां ।

लोटुनी धन्या मालक बनला राव । कां करितां त्यांची कीव ॥१॥ धृ०
अजि सूड तरी त्यांचा कां नच घेतां ? । आठवा पूर्वजें आतां ॥
अशि कशी तुम्हां गुलामी गुंगी आली ? । पारतंत्र्य–धुंदी कसली ॥
मग जीणें नको परवशतेंचें सारें । नच होई तुम्हां कांरे ? ॥

जा उघडा सारीं पानें ।
इतिहास पूर्वीची गानें ।
सांगेल तुम्हां शौर्यानें ।

किती एक तरीं राज्यें केलीं स्वाहा । हा न्याय कसा तो पाहा ॥२॥
किती अन्यायें वधिलें नंद कुमारा । दाविला न्याय तो कोरा ॥
सन अठराशें सत्तावन मग साला । आठवा तुम्हीं त्या काला ॥
तो वृतांतचेरि झाशींचा मग पाहीं । स्वातंत्र्या सती ती लढलीं ॥

सुलतानिा कसेन शाहीं ।
पंजाबी डायर दाहीं ।
जुलमाचे राज्यचें पाहीं ।

त्या स्वातंत्र्या साठीं लढले वीर । जुलमांचा केला कहर ॥ ३ ॥

ARCHIVES OF INDIA
NATIONAL

गत काळीं कसा होता वैभव शिखरीं । परी अतांच निर्धन भारीं ॥
आजि परवें हे दाविती सारी सत्ता । हरविलीं पूर्वीची वित्ता ॥
मग केली अशी दुष्टची करणीं त्यानें । घेतलें राज्य अदयानें ॥

कापट्य जाल पसरून ।
घेतलें सर्व फसवून ।
नच त्यानें रणीं लढवून ।

नच ठेवियलें तुम्हां पाशीं तें काहीं । नेलेंच सर्व हो तेंही ॥ ४ ॥
किती दीन तरीं परदास्यीं रहाणार ? । कां नच रुततें बेडी फार ? ॥
मग तुम्हां कसें सहनची होतें बारें ? । मेंढरे आज तें सारें ॥
तरि अजुनीं करशीं डोळां झापड असलीं । कां नच ये तुम्हा उसळी ?॥

गाजितां दुग्ध सर्पाला ।
उलटाच दंशण्यां फिरलां ।
उपकारा तो विस्मरलां ।

ना दावी दया परीं असल्या दुष्टांसीं । निर्दळा ठेचुनीं त्यांसी ॥ ५ ॥

दे. य. राम

तुरंगवास

प्राप्त झालें कर्मयुग हें, कर्म करण्या सिद्ध व्हा ॥
देश बेढीला परांनीं, हंसत मरण्या सिद्ध व्हा ॥ १ ॥

रुचत कैशी ही गुलामी, परवशतेच्या शृंखला ॥
काय वाटे धन्यता हो, गाढ कैसे झोपलां ॥ २ ॥
तुरुंगाचें वाटतें भय, मर्द कां हो जाहलां ॥
लाजवीते अजि आम्हां सरोजनीदेवि कमला ॥
धन्यभगिनी धैर्यशाली संकटी उडी घालिते ॥ ३ ॥
वीरकन्या वीरपत्नी वीर माता शोभते ॥
संकटाला तोंड देती, आर्य–भगिनी आपुल्या ॥ ४ ॥
तुरुंगाच्या मार्गि देखा, वीर–कन्या चालल्या ॥ ५ ॥
आर्य–कन्या सिद्ध होतां, स्वस्थ आम्ही बैसतों ॥
धिक् जिणें, हा स्वार्थ धिग् धिग् व्यर्थ तनुही वाहतों ॥६॥
वृद्ध मोतीलाल नेहरू, जाति कारागारिं हो ॥
पाहुनी हें वीर–हृदय, काय कैसे स्वस्थ हो ॥ ७ ॥
शांततेच्या असहकारीं, आत्म–यज्ञाचि पेटतो ॥
पाहूं या हो कोण आधीं, ह्यांत उडी घालितो ॥ ८ ॥

महात्मा गांधींचा संदेश

परदेशी बहिष्कार । स्वदेशी प्रेमें स्वीकारा ॥
बहिष्कार राजकीय । शस्त्रासंप्रति हाति धरा ॥
स्वदेशी नौका भरुनी । उतरा स्वराज्य पैलातीरा ॥
असहयोग आचरुनी । सोटेशाही बंद करा ॥
मद्यपान प्रतिबंध करोनी । नीती अवधारा ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राष्ट्रिय शिक्षण देऊनि । बनवा राष्ट्रीय संस्कारा ॥
अन्यायाच्या त्या आड़ेला । मोडूनि झिटकारा ॥
राज्य यंत्र हे बंद पाडण्या । देऊं नका सारा ॥
सैतानी सरकारी नोकऱ्या । नंतर त्याग करा ॥
राम रहिम भक्तानों । बंधु–प्रेमा खास वरा ॥
कुटील राजनीतिला । निस्पृहतेनें धिःकारा ॥
स्वराज्य संपादन सत्कार्यी । लावा हातभारा ॥
राष्ट्रसूत्र धर लोकमान्य बलवंता आज स्मरा ॥
निस्पृहतेनें नरहो । बंदिवासा स्वीकारा ॥
सर्वस्वाला खर्चुनि । आपल्या राष्ट्रा उद्धारा ॥
राष्ट्रप्रेमी सामर्थ्या । देविन्ने हंतारा ॥

पद

आलि द्वारीं, अरुण फेरी, ऊठ जनते सत्वरीं ॥ धृ० ॥
नीज रुचली, अजुनी कसली, दास्य सुरी तळपे उरीं ।
स्वाभिमाना, देशप्रेमा, जागवा हो अन्तरीं ॥ १ ॥
आग भडके, पाश अडके, मायदेशा कन्धरीं ।
गायभूमी, परें लुटुनी, गाजविती सत्ता शिरीं ॥ २ ॥
परकि माला, घालि आळा, व्रत स्वदेशी स्वीकरीं ।
राष्ट्रहानी, दारुपानीं, त्यजि सुराती आसुरी ॥ ३ ॥
हा स्वतंत्र, राष्ट्रमंत्र, घुमत राहो अंबरीं ।
राष्ट्रप्यारा, ध्वज उभारा, विजयि करुनी संगरीं ॥ ४

ARCHIVES OF INDIA NATIONAL